E mail for F-2 Desk:- r&fd_forests_do_f2@maharashtra.gov.in

संत तुकाराम वनग्राम योजना

सुधारीत तरतुदी -२

महाराष्ट्र शासन

महसूल व वन विभाग,

शासन निर्णय क्रमांक : एफडीएम २००५/प्र.क्र.३१३/फ-२

मंत्रालय,मुंबई-४०० ०३२,

दिनांक : - १५|०५|२००८.

**वाचा :- १.शासन निर्णय क्रमांक महसूल व वन विभाग क्रमांक एमएससी-२०००/ प्र.क्र.१४३/ फ-२, दि.२५.४.२००३**

**२.शासन निर्णय समक्रमांक दिनांक २३.११.२००६ व दि.१५.२.२००८**

प्रस्तावना:-

राज्यामधील संयुक्त वनव्यवस्थापन समित्यांना प्रोत्साहन देण्यासाठी संदर्भाधीन शासन निर्णय. दिनांक २३.११.२००६ अन्वये "संत तुकाराम वनग्राम योजना"ची सुरुवात करण्यात आली असून या योजनेस राज्यामधून मोठया प्रमाणावर प्रतिसाद मिळत आहे. शासन निर्णय समक्रमांक दिनांक १५.२.२००८ अन्वये मराठवाडा प्रशासकीय विभागातील उत्कृष्ट संयुक्त वनव्यवस्थापन समितीस रु.१.५१ लक्ष रकमेचे प्रोत्साहनपर बक्षिस देण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. आता शासनाने या योजनेच्या दिनांक २३.११.२००६ च्या शासन निर्णयामध्ये नमूद केलेल्या जिल्हास्तरीय बक्षिसाच्या रकमेमध्ये खालीलप्रमाणे सुधारणा करण्याचा निर्णय घेतला आहे.

शासन निर्णय:-

१. जिल्हा स्तरावरील बक्षीसाच्या रकमेमध्ये वाढ:-

जिल्हा स्तरावरील गुणानुक्रमे उत्कृष्ट ठरणा-या ३ संयुक्त वन व्यवस्थापन समित्यांना संत तुकाराम वनग्राम उत्कृष्ट जिल्हास्तरीय संयुक्त वनव्यवस्थापन समिती पारितोषिक प्रदान करण्यात येते. या पारितोषिकांच्या सुधारीत रकमा खालीलप्रमाणे राहतील.

| | |
|---|---|
| प्रथम क्रमांकाचे बक्षीस | रु.५१,०००/- |
| व्दितिय क्रमांकाचे बक्षीस | रु.३१,०००/- |
| तृतीय क्रमांकाचे बक्षीस | रु.११,०००/- |

सन २००८-०९ या आर्थिक वर्षापासून वरीलप्रमाणे बक्षिसांचे वितरण करण्यात येईल.

(कृ.मा.प.)

या व्यतिरिक्त इतर तरतुदी शासन निर्णय दिनांक २३.११.२००६ प्रमाणेच राहतील.

सदर शासन निर्णय वित्त विभागाच्या अनौपचारीक संदर्भ क्रमांक ९४/०८/व्यय-१०, दिनांक २४.४.२००८ अन्वये प्राप्त झालेल्या सहमतीस अनुलक्षून निर्गमित करण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांचे आदेशानुसार व नांवाने,

( प्रफुल्ल ठाकूर )
कार्यासन अधिकारी
महसूल व वन विभाग.

प्रति-

१) मा.राज्यपाल यांचे सचिव
२) मा.मुख्यमंत्र्याचे सचिव
३) मा.उपमुख्यमंत्री यांचे सचिव
४) सर्व मा. मंत्री, मा. राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव
५)मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन
६)महाराष्ट्र शासनाच्या सर्व संबंधित प्रशासकीय विभागांचे अ.मु.स./प्रधान सचिव/सचिव
७)प्रधान मुख्य वनसंरक्षक, महाराष्ट्र राज्य, नागपूर
८)प्रधान मुख्य वनसंरक्षक (वन्यजीव), महाराष्ट्र राज्य, नागपूर
९) संचालक, सामजिक वनीकरण, महाराष्ट्र राज्य,पुणे
१०) अप्पर प्रधान मुख्य वनसंरक्षक (सर्व )
११)मुख्य वनसंरक्षक (सर्व)/वनसंरक्षक (सर्व)
१२)सर्व विभागीय आयुक्त
१३)सर्व सहसंचालक, सामाजिक वनीकरण संचालनालय,
१४)सर्व उपसंचालक, सामाजिक वनीकरण संचालनालय,
१५)जिल्हाधिकारी(सर्व)
१६)मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद(सर्व)
१७)पोलिस अधिक्षक (सर्व)
१८)प्रकल्प अधिकारी, जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा(सर्व)
१९)उपवनसंरक्षक/ विभागीय वन अधिकारी (सर्व)

(त्यांना विनंती करण्यात येते की, सदर शासन निर्णयाच्या छायाप्रती यांच्या कार्यक्षेत्रातील संयुक्त वनव्यवस्थापन समित्या /ग्रामपंचायती यांना उपलब्ध करुन देण्यात याव्यात.)

२०) उपविभागीय अधिकारी (महसूल)सर्व
२१) जिल्हा विकास अधिकारी(सर्व), जिल्हा कृषि अधिकारी/ मृदसंधारण अधिकारी (सर्व)
२२)सर्व कार्यासन अधिकारी, महसूल व वन विभाग
२३) निवडनस्ती , फ-२ कार्यासन,महसूल व वन विभाग,मंत्रालय,मुंबई-३२